www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११९ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२६ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!
–संपादक







# मनोज जरांगेंच्या आझाद मैदानातील उपोषणाला पोलिसांनी परवानगी नाकारली; पण मनोज जरांगे मुंबई गाठण्यावर ठाम

मनोज जरांगे उद्या २६ जानेवारी रोजी मुंबईत दाखल होणार आहेत. त्यामुळे त्यांच्या आझाद मैदानावरील उपोषणाची मराठा समाजाने जय्यत तयारी केली आहे. आम्ही यापूर्वीच पत्रव्यवहार करून आझाद मैदानाची परवानगी मागितली होती. आम्ही व्यासपीठ उभारण्याचे कामही सुरू केले आहे. उद्या प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडावंदनही याच मैदानात करू, असे मराठा आंदोलकांचे नेते वीरेंद्र पवार यांनी सांगितले आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांनी जरांगेंच्या उपोषणासाठी तयार करण्यात येणारे व्यासपीठ काढण्याची सूचना केली आहे. याविरोधात जरांगे यांचे सहकारी वीरेंद्र पवार यांनी कोर्टात धाव घेतली आहे.दुसरीकडे, मुंबई पोलिसांनी जरांगे यांना एका नोटीसीद्वारे आझाद मैदानात उपोषण करता येणार नाही, असे कळवले आहे. मराठा आंदोलनामुळे मुंबईची दैनंदिन वाहतूक व्यवस्था कोलमडेल. विशेषतः आंदोलकांची संख्या लक्षात घेता मुंबईत आंदोलकांना जागा पुरेल एवढे मोठे एकही मैदान नाही. त्यामुळे आंदोलन करण्यासाठी खारघरमधील इंटरनॅशनल कॉर्पोरेशन पार्क मैदान संयुक्तिक राहील, असे पोलिसांनी जरांगे यांना आपल्या नोटीसीद्वारे सूचवले आहे.मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईत विविध वित्तीय संस्था, आंतरराष्ट्रीय वकिलाती व इतर वित्तीय केंद्रे कार्यरत आहेत. मुंबईत अंदाजे दररोज ६० ते ६५ लाख नागरिक हे नोकरी निमित्ताने ट्रेन व इतर वाहतुकीच्या माध्यमाने प्रवास करत असतात. सकल मराठा समाज आंदोलक हे प्रचंड मोठ्या वाहन संख्येसह मुंबईत आल्यास त्याचा विपरीत परिणाम होईल आणि मुंबईची दैनंदिन वाहतूक व्यवस्था कोलमडणार आहे.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आझाद मैदानाचे ७००० स्क्वेअर मीटर एवढेच क्षेत्र आंदोलनासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहे. त्याची क्षमता ५ ते ६ हजार आंदोलकांना सामावून घेण्याची आहे. तिथे प्रचंड मोठ्या संख्येने आंदोलक आल्यास त्यांना थांबण्यासाठी मैदानात मुबलक जागा उपलब्ध होणार नाही. परिणामी, त्यांना त्या प्रमाणात सोईसुविधाही मिळणार नाहीत. तेथील उर्वरित मैदान क्रीडा विभागाच्या अख्यत्यारित असून शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक मैदान ३०२४/प्र.क. १२/२०२४/कीयुसे-१, दि. २४.०१.२०२४ अन्वये तेथे आंदोलनासाठी परवानगी देण्यात आलेली नाही.आपण लाखोंच्या संख्येने आंदोलक व वाहनांसह मुंबईत येणार असल्याचे घोषित केले आहे. त्यामुळे मुंबईतील दैनंदिन जनजीवन विस्कळीत होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तसेच मुंबईची भौगोलिक स्थिती, लोकसंख्या, वाहनांची संख्या, अरुंद रस्ते, उपलब्ध नसलेले पर्यायी रस्ते, खोळंबणारी वैद्यकीय सोयीसुविधा, त्यामुळे होणारी रुग्णांची हेळसांड व इतर अत्यावश्यक सेवांवर होणारा प्रभाव पाहता मुंबईतील एकूण सार्वजनिक सुव्यवस्थेवर विपरीत परिणाम होणार आहे. त्याचप्रमाणे आपण वेळोवेळी सांगितल्याप्रमाणे हे आंदोलन प्रचंड संख्येचे असून मुंबईमधील कोणत्याही मैदानामध्ये एवढ्या प्रचंड मोठ्या संख्येच्या आंदोलकांना सामावून घेण्याची क्षमता नाही. त्याचप्रमाणे सदरचे आंदोलन हे अनिश्चित कालीन असल्याने त्यासाठी आवश्यक सोयी सुविधा दीर्घकाळासाठी मुंबईमध्ये पुरवणे शक्य होणार नाही. विशेषतः त्याचा परिणाम सार्वजनिक आरोग्य व इतर नागरी सुविधांवरही होणार आहे.ज्याअर्थी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आम्हांस आंदोलनासाठी योग्य जागा आपणांस कळविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत, त्याअर्थी आपणास शांततामय मार्गाने आंदोलन करण्यासाठी इंटरनॅशनल कॉर्पोरेशन पार्क मैदान, सेंटर पार्क जवळ, सेक्टर २९, खारघर, नवी मुंबई हेच मैदान संयुक्तिक राहील. तरी सदर ठिकाणी आंदोलन करण्याकरिता आपण संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज करुन रितसर परवानगी घ्यावी.म्हणून ज्याअर्थी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमिनल रिट पिटीशन क. १८८/२०२४ यामध्ये दि. २४.०१.२०२४ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशामध्ये उद्धृत केलेले मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे अमित साहनी वि. पोलीस आयुक्त व इतर या प्रकरणातील न्याय निर्णय (विशेषतः परिच्छेद क. १७, १९, २१ मध्ये दिलेले दिशानिर्देश), तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व विविध उच्च न्यायालये यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या इतर न्याय निर्णयामध्ये आंदोलनकर्त्यासाठी दिलेले निर्देश यांचे तंतोतंत अनुपालन आपण रस्त्यावर आणि सार्वजनिक ठिकाणांवर करणे अनिवार्य आहे. त्याचे अनुपालन न केल्यास मा. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांची अवमानना होईल याची आपण नोंद घ्यावी, असे पोलिसांनी आपल्या नोटीसीत म्हटले आहे.



मुंबई–मराठा आरक्षणासाठी सरकारशी दोनहात करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानावरील उपोषणाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आझाद मैदान पोलिसांनी या प्रकरणी जरांगेंना उपोषणासाठी आझाद मैदान अपुरे असल्याचे नमूद करत त्यांना नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर २९ मधील इंटरनॅशनल कॉर्पोरेशन पार्क मैदानात उपोषणाला बसण्याची सूचना केली आहे. पण त्यानंतरही जरांगे आपल्या आझाद मैदानातील मुक्कामावर ठाम असून, त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना आपल्या गाड्यांची तोंडे मुंबईच्या दिशेने वळवण्याचे आदेश दिलेत.

# पाचही व्याघ्र संवर्धन प्रकल्पांचा तयार होणार एकत्रित पर्यटन आराखडा-वनमंत्री मुनगंटीवार

## वनामृत हा होणार आता वन विभागाचा ब्रॅण्ड ;एकिकृत वंदे मातरम वनसेवा केंद्रांची निर्मिती करणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील व्याघ्र संवर्धन प्रकल्प हे आपले वैभव आहेत. हे वैभव जगापुढे येणे आणि पर्यटकांना त्याठिकाणी आकर्षित करण्यासाठी या सर्व व्याघ्रप्रकल्पांच्या सोईसुविधांमध्ये एकसूत्रता आणणे गरजेचे आहे. त्यासाठी पाचही व्याघ्र प्रकल्पांचा एकत्रित पर्यटन आराखडा तयार करावा, असे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. त्याचप्रमाणे वन विभागामार्फत उत्पादित वस्तूंसाठी यापुढे वनामृत हा एकच ब्रँड वापरण्याचा निर्णयही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज २५ जानेवारीला जाहिर केला. राज्यातील व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानच्या नियामक मंडळाची बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक शैलेश टेंभुर्णीकर आणि महिप गुप्ता यांच्यासह ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, पेंच-बोर व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, आणि नवेगाव - नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक, इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, पाचही व्याघ्र प्रकल्पाचा पाच वर्षासाठी एकत्रित पर्यटन आराखडा तयार करण्यात यावा. एखाद्या व्याघ्र प्रकल्पात अभिनव उपक्रम राबविले गेले असतील तर त्याची इतर ठिकाणी अंमलबजावणी करता येईल का, याचा विचार व्हावा. व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांची संख्या वाढण्याच्या दृष्टीने अनुकूल वातावरण त्याठिकाणी राहील, हे पाहावे, अशा सूचना त्यांनी केल्या.राज्यातील व्याघ्र



प्रकल्पांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी चांगल्या सुविधा, सेल्फी पॉईंटसची निर्मिती करावी. तेथील परिसरातील गावातील घरांच्या भिंतीवर वन्यजीव आणि पर्यावरणपूरक चित्रे रंगवून अधिकाधिक वातावरणनिर्मिती करावी. स्थानिक नागरिकांना रोजगारनिर्मितीसाठी कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, येथील महिला-युवक यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळेल, यासाठी प्रयत्न करणे, व्याघ्र प्रकल्पाद्वारे निर्मित वस्तूंचे योग्य ब्रँडींग होईल, त्यामध्ये एकसमानता असेल, याकडे लक्ष देण्याची सूचना त्यांनी केली.या प्रकल्पातील बांबू झाडांच्या फुलोऱ्याचे व्यवस्थापन करणे, बीज साठवण, अग्नी संरक्षण या बाबींकडे अधिक गंभीरतेने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, प्रत्येक व्याघ्र प्रकल्पाने त्यांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी क्युआर कोड तयार करावा. ज्याठिकाणी नदी, तलाव आहेत, तेथे हाऊसबोट सारखी संकल्पना राबवावी.पाचही व्याघ्र संवर्धन प्रकल्पात वंदे मातरम वनसेवा केंद्र सुरु करण्यात यावे. ज्याप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्रांवर राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळते, त्याप्रमाणे वन विभागाच्या योजनांची माहिती आणि सेवा या केंद्रातून सुरु करण्याचे निर्देशही मंत्री मुनगंटीवार यांनी दिले. विविध व्याघ्र प्रकल्पात अभिनव उपक्रम राबवले जात आहेत. ते त्याच प्रकल्पापुरते मर्यादीत न राहता त्याची अंमलबजावणी इतरही प्रकल्पात करण्यात यावी, यासाठी एक समिती नेमून त्याआधारे अभ्यास करुन एका महिन्यात त्यासंबंधी कार्य अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.सध्या सर्व व्याघ्र प्रकल्पांना त्यांच्या कामाबद्दल केंद्रीय यंत्रणेने अधिक चांगला शेरा दिला आहे. हा शेरा कायम उत्कृष्ट राहील, यासाठी सर्वांनी काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.वन विभागामार्फत उत्पादित वस्तूंची आता वनामृत या एकाच ब्रॅण्डनेमद्वारे प्रसिद्धी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. विविध व्याघ्र प्रकल्पात वस्तू / उत्पादन निर्मित होत असले तरी ते जगभर एकाच नावाने ओळखले जावे, यादृष्टीने प्रयत्न करावेत, अशी सूचना मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली.यावेळी व्याघ्र प्रकल्पांच्या सर्व क्षेत्रसंचालकांनी सादरीकरण करुन त्याठिकाणी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

# आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी शिबीर संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटतर्फे दि १८ जानेवारी ते २४ जानेवारी दरम्यान 'शाश्वत विकासासाठी युवक' या संकल्पनेवर आधारित विशेष निवासी शिबिराचे आयोजन शेगांव (खुर्द) येथे करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये समाजभान रुजावे तसेच त्यांना श्रमसंस्काराचे वळण लागावे या उद्देशाने आयोजित या निवासी शिबिरात वेगवेगळ्या प्रबोधन, श्रमदान व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये शेगांव (खुर्द) ग्रामवासियांसाठी प्रामुख्याने कृषी व कृषीसंबंधित विषयांवर भर देण्यात आला होता. शिबिराचे उद्घाटन शेगांव गावचे सरपंच लभाने, तंटामुक्ती अध्यक्ष भिवदरे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. जोगी यांच्या उपस्थितीत तसेच आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुहास पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मान्यवर उपस्थित होते. या सात दिवसीय निवासी शिबिरामध्ये शेतकऱ्यांना शेतीची तांत्रिक माहिती मिळावी व त्यांना शेतीपूरक गोष्टींना अवगत करण्यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन कृषी महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले होते. यात प्रामुख्याने ग्रामस्वच्छता, उन्नत भारत अभियानांतर्गत ग्रामसर्वेक्षण, शेतकऱ्यांसाठी शेंद्रीय शेतीचे प्रात्यक्षिक व सल्ला, ग्रामप्रबोधनपर पथनाट्ये, रांगोळीच्या माध्यमातून स्वच्छता, पशुधन चिकित्सा व लसीकरण असे कार्यक्रम राबविण्यात आले. यात गावातील व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या शेंद्रिय खतांची निर्मिती करण्याचे मार्गदर्शन, पिकांवरील रोग-किडींचे शेंद्रीय पद्धतीने एकात्मिक व्यवस्थापन, इत्यादीवर मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व अभिव्यक्ती विकासासाठी बौद्धिक सत्रामध्ये वेगवेगळ्या तज्ज्ञांना मार्गदर्शनासाठी निमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये व्यक्तिमत्व विकास, कृषी सेवेतील वाटचाल, फोटोग्राफीमधील कौशल्य, योग आणि प्राणायाम यासारख्या विषयांवर मार्गदर्शनपर सत्रे आयोजित करण्यात आली. समारोपीय कार्यक्रमात प्राचार्य डॉ. पोतदार, कार्यक्रम अधिकारी तसेच सरपंच, ग्रामपंचायत सदस्य मंडळ उपस्थित होते. एकंदरीत या आठवडाभर चाललेल्या निवासी शिबिरामुळे शेगांव खुर्द गावाच्या एकोप्याचा आणि सहकार्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. हे निवासी शिबीर यशास्वीरीत्या पार पडण्यासाठी रा. से. यो. युनिटचे कार्यक्रम अधिकारी डॉ. जोगी यांच्या मार्गदर्शनाखाली इतर शिक्षक डॉ.पातोंड, डॉ.मानकर, पुसदेकर, डॉ.पाटील, डॉ.पारधी, बनकर, तसेच शिक्षकेतर कर्मचारी, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मत्ते व शिक्षकगण, ग्रामस्थ यांनी विशेष परिश्रम घेतले.




# सिंधुताई बर्वे यांचे अल्पशा आजाराने निधन

**वरोरा :** मालवीय वार्डातील व्होल्टासागर कॉलनी येथील रहिवासी, सामाजिक कार्यकर्ते विवेक बर्वे यांच्या मातोश्री सिंधुताई अम्बादासजी बर्वे ( वय ८१ वर्षे ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज गुरुवार २५ जानेवारी रोजी दुपारी ५.०० वाजता मालवीय वार्डातील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, तीन मुली आणि मोठा आप्तपरिवार आहे.



## इंडिया आघाडी अशी कुठली आघाडीच नव्हती-फडणवीस

**मुंबई**–इंडिया आघाडीच्या जागा वाटपासंदर्भात गोंधळ सुरू आहे. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, अशी कुठली आघाडी अस्तित्वातच नव्हती. देशातील सर्व पक्ष एकत्र आले आहेत, मात्र प्रत्येकजण आपआपलं वेगळं गाणं गात असल्याने आघाडीची बिघाडी होत आहे.फडणवीस म्हणाले- एकत्रित गायचं असेल, समुहगीत गायचं असेल, तर त्यासाठी तुम्हाला कोरसमध्ये गाणं गरजेचं असतं. प्रत्येकाने एकाच दिशेने गायण करावं लागतं. मात्र सध्या इंडिया आघाडीत फूट पडलेली दिसत आहे. इंडिया आघाडीचा जो प्रयत्न होता, तो आता उघडा पडला आहे. काँग्रेस पार्टी इतर राज्यातील लहान-मोठ्या पक्षांना सोबत घेऊन ही आघाडी करत होता. परंतु या लहान-मोठ्या रिजनल पक्षांची व्होट बँक काँग्रेसकडे जाऊ नये, याचीही काळजी तेथील रिजनल पक्ष घेत आहेत. त्या रिजनल पक्षांची काँग्रेसशी स्पर्धा आहे. त्यामुळे ते काँग्रेससोबत आपला व्होट शेअर करू शकत नाही.

# मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३४ व्या अधिवेशनाने प्राध्यापकांना काय दिले?

**मागील १९ आणि २० जानेवारीला नागपूर (कामठी) येथील पीडब्ल्यूडीएस महाविद्यालयात मराठी प्राध्यापक परिषदेचे ३४ वे अधिवेशन थाटात संपन्न झाले. या अधिवेशनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली या दोन्ही विद्यापीठातील मराठी या विषयाची अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्राध्यापकांच्या उपस्थितीने गर्दीचा उच्चांक मोडला. हे अधिवेशन आटोपून घरी परतत असताना या अधिवेशनात प्राध्यापकांना काय मिळाले? नेमके काय वाटते? हे या प्रतिक्रियांच्या माध्यमातून जाणून घेण्याचा हा प्रयत्न मराठीतील अग्रगण्य दैनिक सह्याद्रीचा राखणदार ने केला आहे.बघुया उपस्थितांच्या निवड प्रतिक्रिया.**




डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२
e sahyandrinews@gmail.com








हे द्विदिवसीय अधिवेशन म्हणजे मराठी मायबोलीचा' मातृभाषेचा वैचारिक जागरच ! उद्घाटकीय समारंभापासून ते समारोपीय कार्यक्रमापर्यंतचे या महाविद्यालयाने केलेले नियोजन प्रशंसनीय होते. उद्घाटन समारंभातील डॉ. सुधीर रसाळ यांचे मराठी भाषेबद्दलचे अंतर्मुख करणारे चिंतन, या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी मराठी विषयाच्या बदलत्या स्वरूपाची जाण आणि भान, प्राध्यापकांपुढील असलेली अद्यावत तंत्रज्ञानाची आव्हाने आणि सकारात्मक दृष्टिकोन यावरील भाष्य मराठी प्राध्यापकांना बरेच काही सांगून गेले.

प्रत्येक सत्रातील बौद्धिक परिसंवाद नि त्यातील असलेले पूरक विषय, वक्तांची अभ्यासपूर्ण हातोटी, मराठी भाषेचे विषयाचे मूल्यगर्भ चिंतन वाखाणण्यासारखे होते.अशा वैचारिक मंथनासोबतच या परिषदेने पहिल्यांदाच मराठी प्राध्यापकांच्या सुप्त कला गुणांचा शोध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. 'प्राध्यापक संगीतरजनी' असे गोड शीर्षक देऊन अनेक गळे गाते झालेत. नागपुरच्या गुलाबी थंडीत या कार्यक्रमाने विशेष रंगत आणली. 'शिक्षक हा सर्वांग परिपूर्ण असावा नव्हे, तो असतोच' हे सिद्ध केले. मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड यांची सर्वांप्रती असणारी आस्था, आपुलकी सोबतच परिषदेचे सन्माननीय सचिव,सर्व पदाधिकारी यांचा स्नेहभाव, ज्येष्ठ मंडळींच्या भेटीगाठी, मित्रमंडळींचा सहवास आणि विशेष म्हणजे या सर्वांना सहृदयाने सामावून घेणारे महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, या परिषदेचे संयोजक- डॉ मनीषा नागपुरे सह संयोजक- डॉ. अमृता डोर्लीकर व त्यांचा मराठी विभाग, या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक- शिक्षकेत्तर बंधू भगिनी यांनी दाखविलेले कौटुंबिक सख्य, दोन दिवसांचे स्वादिष्ट भोजन करून सर्वांनी दिलेला तृप्तीचा ढेकर आम्ही कसे विसरणार बरे !

**- डॉ.सुनील पखाले**
**नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा ( घाडगे), जि. वर्धा**

मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३४ व्या अधिवेशनाचे आयोजन दर्जेदार व उत्कृष्ट होते. या अधिवेशनामधील अधिवेशन अध्यक्ष आदरणीय डॉ. राजेंद्र नाईकवाडे सरांचे उदघाटन व समारोप सत्राचे भाषण मराठी प्राधापकांना नवचेतना देणारे होते.अधिवेशनाचे सर्वच सत्र मराठी प्राध्यापकासाठी महत्त्वपूर्ण होते. अधिवेशनातील सर्वच सत्राध्यक्षांची भाषणे व वक्त्यांची भाषणे माझ्यासाठी बोध घेणारी ठरली. रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा छान होते. आयोजक डॉ. मनीषा नागपुरे मॅडम, डॉ.डोर्लीकर मॅडम, डॉ. गणेश मोहोड सर, डॉ. राजेंद्र वाटाणे सर आपण केलेल्या अधिवेशनाच्या इतक्या सुंदर आयोजनाबद्दल आपले धन्यवाद आणि आभार.

**-डॉ. अशोक भक्ते**
**नगरपरिषद शिवाजी महाविद्यालय मोवाड,तालुका नरखेड,जिल्हा नागपूर.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गोंडवाना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी प्राध्यापक परिषदेचे ३४ व्या अधिवेशनाचे अतिशय सुंदर, देखणे असे आयोजन डॉ. मधुकरराव वासनिक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे करण्यात आले. या अधिवेशनाला लाभलेले सन्माननीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांचे अध्यक्षीय भाषण फारच मौलिक होते. तसेच अधिवेशनाच्या उद्घाटननीय सोहळ्याला उपस्थित असलेली ज्येष्ठ साहित्यिक मंडळी मनाला आल्हाद देणारी ठरली. या अधिवेशनाच्या निमित्ताने ज्ञानवर्धिष्णू अशा परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेले होते. या परिसंवादाच्या माध्यमातून झालेली चर्चा अभ्यासकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. त्याचप्रमाणे पी डब्ल्यू एस महाविद्यालयाने अधिवेशनाला आलेल्या सर्व अतिथी मान्यवर मंडळी आणि प्राध्यापकांकरिता केलेल्या स्नेहभोजनाचे आयोजन आणि निवास व्यवस्था देखील सुव्यवस्थितीत होती. या अधिवेशनाला प्राध्यापकांनी दिलेला प्रतिसाद लक्षवेधक ठरला. याकरिता मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष, डॉ. गणेश मोहोड व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मराठी विभाग प्रमुख यांनी घेतलेल्या परिश्रमाची जणू ही फलश्रुती आहे असे मला वाटते.

**-प्रा. डॉ. प्रवीण घारपुरे**
**जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम ता. नरखेड, जि. नागपूर**

१९६८ पासून अस्तित्वात असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. मराठी प्राध्यापक परिषद अत्यंत महत्त्वाची म्हणून ओळखली जाते . या परिषदेद्वारे आयोजित अधिवेशनाचे आतापर्यंत अनेक नामवंत अभ्यासक व साहित्यिकांनी अध्यक्ष पद भूषविलेले आहे. यंदाचे चौतिसावे द्वीदिवसीय अधिवेशन दि.१९ व २० जानेवारी २०२४ ला नागपूरातील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली पी. डब्ल्यू. एस. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे अत्यंत उत्साहात पार पडले.हे अधिवेशन मराठीच्या प्राध्यापकांसाठी अत्यंत महत्त्वाचे होते. या अधिवेशनात आयोजकांनी उद्घाटन प्रसंगी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. सुधीर रसाळ यांना पाचारण केल्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला अत्यंत मुलगामी व महत्त्वाचे मार्गदर्शन लाभले. त्याचा उपयोग माझ्या भावी जीवनात नक्कीच होणार आहे. या दोन दिवशीय अधिवेशनात 'वैदर्भीय साहित्य आकलन आणि आस्वाद', 'प्रसार माध्यमे आणि मराठी साहित्य' व 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वांग्मयीन योगदान' अशा महत्त्वाच्या विषयावर परिसंवादाचे आयोजन केले. या परिसंवादातून साहित्य विषयक बौद्धिक मेजवानीच मिळाली. यातून ज्ञानाचे अद्यावतीकरण झाले. 'मराठी प्राध्यापकांची संगीत रजनी' कार्यक्रमामुळे काही प्राध्यापकांमध्ये असलेल्या गान कलेबद्दलची माहिती सर्वांना झाली. यातून एक वेगळाच अनुभव मला मिळाला. या अधिवेशनात खुल्या अधिवेशनाचे सत्र ठेवून परिषद, अधिवेशनावर भविष्यकालीन नियोजन व उपक्रमांवर चर्चा केली या अधिवेशनातील परिसंवादात व खुल्या अधिवेशनात नवीन व जुन्या अभ्यासकांना संधी देत एकूणच महत्त्वपूर्ण समन्वय साधला. मला व्यक्तिशः या अधिवेशनाचा अनुभव म्हणजे माझ्या भावी वाटचालीस एक मोलाचा ठेवाच ठरला आहे. या अधिवेशनाचे नियोजन, आगत स्वागत, खानपानाची व्यवस्था व राहण्याची व्यवस्था अत्यंत आनंददायी होती. या अधिवेशनामुळे जुन्या मित्रांच्या भेटी झाल्या. व नवीन अभ्यासक व मित्रांशी ओळखही झाली. आयोजकांचे नियोजनतर उत्तमच होते. परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड व सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे यांच्या समन्वयाच्या भूमिकेमुळे हे अधिवेशन यशस्वी झाले. या अधिवेशनामूळे मला मनस्वी आनंद झाला. मराठी प्राध्यापक परिषदेच्या वतीने असे उपक्रम होत राहो. हीच अपेक्षा.

**-डॉ. माधव कांडणगिरे**
**चिंतामणी महाविद्यालय, घुग्घूस जिल्हा- चंद्रपूर**

नवीन शैक्षणिक धोरण स्नातक विभागाला २०२४-२५ पासून लागू होत आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणातून नवीन अभ्यासक्रमाची रूपरेषा, मराठीच्या प्राध्यापकांसमोरील आव्हाने आणि त्यासाठी घ्यावे लागणारे परिश्रम याबद्दल सविस्तर माहिती मिळाली. परिसंवादातून वैदर्भीय साहित्याचे विविध पैलू उलगडले गेले. तसेच प्रसार माध्यमावरची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाङ्मयीन योगदान यावरील अभ्यासपूर्ण भाषणांचा लाभ घेता आला. ललित साहित्य आणि वैचारिक साहित्याचा सुंदर मेळ या अधिवेशनात घातल्या गेला. उत्कृष्ट आणि आटोपशीर सूत्रसंचलनाने कार्यक्रमाची रंगत वाढविली. संपूर्ण अधिवेशनातील परीसंवादातून बुद्धीला चालना देणारे विषय चर्चिले गेले. एकंदरीत आयोजन देखणे व संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन नीटनेटके होते. आयोजकांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच अधिवेशन ज्ञानवर्धिष्णू झाले.

**-डॉ.जयश्री संजय सातोकर**
**प्रगती महिला कला महाविद्यालय, भंडारा.**

दोन दिवसीय अधिवेशनाचे उद्घाटन औरंगाबाद येथील ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक माननीय डॉ. सुधीर रसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले असून या अधिवेशनामध्ये नागपूर येथील पीपल्स वेल्फेअर सोसायटीचे सचिव माननीय ड. मोहनजी वासनिक उपस्थित होते. या अधिवेशनामध्ये तीन बौद्धिक सत्र आयोजित करण्यात आली होती. विषय अनुक्रमे 'वैदर्भीय साहित्य आकलन आणि आस्वाद', 'प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाङ्मयीन योगदान' प्रस्तुत तिन्ही विषय खऱ्या अर्थाने आज सामाजिकदृष्ट्या अत्यंत ज्वलंत आणि समाजोपयोगी घटकांवर प्रकाश टाकणारे होते. कारण साहित्य आणि मानवी जीवन यांचा अन्योन्य संबंध असतो हे सर्वश्रुत आहेच. त्याचबरोबर कोणत्याही विषयावर भाष्य करताना भाष्यकारांच्या एकंदर अभ्यासाची चुनुक दिसते असे मला क्षणभर जाणवून गेले आणि एकंदरीतच विचार करता (सत्काराच्या माध्यमातून माजी अध्यक्ष आणि सेवा निवृत्त पदाधिकारी यांना दिलेला मान संगीत रजनी च्या माध्यमातून सादर होणा-या कला) इतर अधिवेशनाच्या तुलनेत ३४ वे अधिवेशन थोडे वेगळे आणि प्रगतीपथाकडे जाणारे वाटले, ते यासाठी की यातील भाष्यकारांच्या भाषणातील विचार व्यूह आणि परिषदेतील पदाधिकाऱ्यांनी केलेले हे जबाबदारीपूर्ण नियोजन होते असेच म्हणावे लागेल.

**प्रा. डॉ सुनंदा चरडे**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी ता. चिमूर जि. चंद्रपूर.**

# आपल्या देशाचा सुवर्णदिन कोणता रे भावा?

**भारतातील सर्व शाळा आणि महाविद्यालये तसेच शासकीय-खाजगी संस्था, ग्रामपंचायती अशा विविध ठिकाणी ध्वजवंदन केले जाते आणि भारतीय संविधानाप्रती आदर व्यक्त केला जातो. लेखाद्वारे या अविस्मरणीय दिवसाची आठवण ताजी करत श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी आपले मन पुलकित करण्याचा प्रयत्न करत आहेत... संपादक.**

२६ जानेवारीचा हा राष्ट्रीय समारंभ असल्यामुळे या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. दि.२६ जानेवारी १९५० रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने संविधान अंमलात आणून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. प्रजासत्ताक दिवस भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक आहे. अन्य दोन- स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट व गांधी जयंती २ ऑक्टोबर हे आहेत. या दिवशी भारताची राजधानी नवी दिल्ली येथे एक मोठी परेड- संचलन राजपथ मार्गावरून निघते. भारतीय प्रजासत्ताक दिवस हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय सणाचा दिवस आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान समितीने दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारले व दि.२६ जानेवारी १९५०पासून ते अंमलात आणले गेले. पं.जवाहरलाल नेहरू यांनी दि.३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची- स्वातंत्र्याची घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला मानवंदना दिली जाते, राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्णदिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा, महाविद्यालय शासकीय कार्यालय यांमध्ये विविध कार्यक्रमांसह भाषणे आयोजित केली जातात. संविधान प्रास्ताविकेचे मोठ्याने वाचन केले जाते.



भारताला दीडशे वर्षांहून अधिक कालावधीतील ब्रिटीश राजवटीपासून दि.१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. यामागे भारताचा स्वातंत्र्यलढा आणि त्यातील म.गांधींच्या अहिंसा पद्धतीचा मोठा हातभार आहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचे कायदे हे मात्र भारतीय राज्यशासनाच्या सन १९३५ सालच्या कायद्यावर- कलमावर आधारित होते. दि.२९ ऑगस्ट १९४७ रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापना केली गेली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे दि.४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला होता. तब्बल २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवसाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर समितीने हा मसुदा अंतिम केला. बरेचसे विचारविमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती- हिंदी आणि इंग्रजी या दि.२४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी लागू करण्यात आले. म्हणून भारतीय संविधानाच्या निमित्ताने हा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येऊ लागला.

दरवर्षी २६ जानेवारी रोजी भारताच्या राजधानीत म्हणजे नवी दिल्ली येथे एक मोठे संचलन आयोजित केले जाते. हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. संचलनाच्या अगोदर अनाम सैनिकांसाठी बनवले गेलेले स्मारक व अमर जवान ज्योती येथे भारताचे पंतप्रधान पुष्पचक्र अर्पण करतात. भारतासाठी आपले प्राणार्पण करणाऱ्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात येते. त्यानंतर पंतप्रधान राजपथाच्या मुख्य मंचावर जातात व आलेल्या पाहुण्यांना भेटतात. तेवढ्यात प्रमुख पाहुण्यांसोबत राष्ट्रपतींचे आगमन होते. राष्ट्रगीत सुरू होताच राष्ट्रपती ध्वजारोहण करतात आणि २१ तोफांची सलामी दिली जाते. त्यानंतर देशासाठी शौर्य गाजवलेल्या सैनिकांना राष्ट्रपतींच्या हस्ते अशोकचक्र आणि कीर्तिचक्र हे मुख्य पुरस्कार देण्यात येतात. राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेली देशातील शूर बालके सजवलेल्या हत्तीवरून किंवा वाहनावरून या संचलनात सहभागी होतात. प्रमुख पाहुणे म्हणून परराष्ट्रीय राष्ट्राध्यक्षांना निमंत्रण दिले जाते. भारतीय फौजा- नौदल, पायदल, वायुसेना यांचे वेगवेगळे सेनाविभाग, घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि इतर अद्ययावत शस्त्रे-क्षेपणास्त्रे जसे- पृथ्वी, अग्नी, रणगाडे समवेत संचलन करतात. भारताचे राष्ट्रपती या फौजांची मानवंदना स्वीकारतात. भारताच्या विविधतेतून एकता या वैशिष्ट्याला ही मानवंदना असते. या संचलनाच्या सादरीकरणाची पूर्वतयारी विशेष काळजीपूर्वक व शिस्तीने केली जाते, इतके या संचलनाचे महत्त्व आहे. नवी दिल्ली येथे होणार्या संचलनाप्रमाणेच भारतातील सर्व राज्यांतही एकेक संचलन होते. प्रत्येक राज्यात त्या त्या राज्याचे राज्यपाल फौजांची मानवंदना स्वीकारतात. शेवटी बीटिंग रिट्रीट या कार्यक्रमाने प्रजासत्ताक दिन सोहळ्याची सांगता केली जाते.

प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी देशभक्तीपर गीतांच्या ओळी, तिरंगा ध्वज आदी संकल्पनांचा कल्पकतेने वापर करून परस्परांना शुभेच्छा दिल्या जातात. देशाभिमान मनात टिकून राहण्यासाठी भारतीय नागरिक अशा शुभेच्छा एकमेकांना देऊन परस्परांमधील ऐक्य टिकवून ठेवण्याचे आवाहनही केले जाते.

!! भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या सर्व देशप्रेमी बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.**

# शिवसेना युवासेना शहर प्रमुखाची धारदार शस्त्राने हत्या



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट युवासेना चंद्रपूर शहर प्रमुख शिवा मिलिंद वझरकर (३०) यांची २५ जानेवारीला रात्री ९:३० वाजता च्या दरम्यान धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली. ही हत्या चंद्रपूर येथील तुकूम परीसरातील अग्रवाल कोचिंग क्लासेस च्या बाजुला करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वझरकर हे आज रात्री ९:०० वाजताच्या सुमारास अग्रवाल कोचिंग क्लासेस च्या बाजुला उभे होते. त्यावेळी अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात वझरकर गंभीर जखमी झाले आणि त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. वझरकर यांची हत्या नेमकी का करण्यात आली याबाबत अद्याप काही स्पष्ट झालेले नाही. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. संशयितांना पोलीसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. वझरकर हे चंद्रपूर शहरातील शिवसेना युवासेनेचे सक्रिय कार्यकर्ते होते. ते शहरातील अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी असत . त्यांच्या हत्येने चंद्रपूर शहरात खळबळ माजली आहे.

# राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना अभियानातंर्गत समितीची कार्यशाळा

**चंद्रपूर**-रस्ते आणि वाहतूक मंत्रालयातर्फे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना दि. १५ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पाळण्यात येत आहे. त्याअंतर्गत प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, चंद्रपूर व परिसर संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा रस्ता सुरक्षा समिती सदस्यांची कार्यशाळा नियोजन भवन सभागृह येथे पार पडली.

कार्यशाळेला जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे सदस्य, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद मेश्राम तसेच मोटार वाहन विभागातील अधिकारी, कर्मचारी, वाहतूक पोलीस तसेच तालुकास्तरावरील नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उपस्थित होते.या कार्यशाळेतंर्गत जिल्ह्यातील रस्ते अपघात व मृत्यू यांच्या सद्यस्थितीची माहिती, रस्ता सुरक्षा समस्या व आव्हाने या विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच उपस्थित सदस्यांना सुरक्षित कार्यप्रणाली व हेडन मॅट्रिक्स या संकल्पनेबाबत इत्यंभूत माहिती देण्यात आली. रस्ता सुरक्षा समिती कार्यकारिणी बाबत मार्गदर्शन करून सदस्यांना रस्ता सुरक्षा, जोखमीचे घटक जसे वेग-मर्यादा, सीट बेल्ट, हेल्मेट, मद्यपान करून वाहन चालविणे, सदोष रस्त्यांची रचना आणि तात्काळ वैद्यकीय सुविधा याविषयीची माहिती अवगत करण्यात आली. तसेच दृश्य स्वरूपात नियमित वाहतूक नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी परिसर संस्थेचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी संदीप गायकवाड व सुशील पठारे यांनी यावेळी सांगितले.

# रक्तविहिन क्रांतीने देश स्वातंत्र्य !

भारताला या ब्रिटीश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. या मागे भारताचा स्वातंत्र्य लढा आणि त्यातील महात्मा गांधी यांच्या अहिंसा पद्धतीचा मोठा सहभागआहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचे मात्र कायदे हे भारतीय राज्य शासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर (कलमावर) आधारित होते.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापना केली गेली. या समितीने बाबासाहेबांना कसले ही सहकार्य केले नाही, उलट बाबासाहेबांनी संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला. २ वर्ष, ११ महिने आणि १७ दिवसाच्या कालावधी नंतर हा मसुदा अंतिम केला. एकटया बाबासाहेब आंबेडकरांनी घटना तयार करतांना त्यांनी कल्पनातीत परिश्रम घेतले व जी असामान्य बुध्दीमत्ता प्रगट केली ती खरोखरच संस्मरणीयच म्हणावी लागेल, यात शंका नाहीच. बाबासाहेबांमुळेच भारतीय राज्यघटना जगमान्य झाली. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती (हिंदी आणि इंग्रजी) २४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी समर्पित करुन लागू करण्यात आले. भारताच्या संविधानाच्या निमित्ताने भारताचा प्रजासत्ताक दिन हा साजरा करण्यात येऊ लागला.

दरवर्षी प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय दिन म्हणुन २६ जानेवारी ला साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० ला अंमलात आलेली स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताची नवी राज्यघटना नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारतीय घटनेचे एक महान शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाचा भारत देशाने स्वीकार करून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. लोकशाही म्हणजे जनतेसाठी, जनतेचे व जनतेने चालविलेल्या राज्यांचे तत्व अंतर्भूत केले आहे. ती घटना जर दीर्घकाळपर्यंत टिकावी अशी आपणांस इच्छा असेल तर आपणापुढे जी संकटे वाढून ठेवलेली आहेत, ती समजून घेण्यास आपण विलंब लावता कामा नये. तसेच त्याचे निराकरण करण्यास असमर्थ राहता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच मार्ग आहे असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले.



प्रविण बागडे,नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

२६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते. भारताचे राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा महाविद्यालयांमध्ये भाषणाचे विविध देशभक्तीपर मनोरंजनाचे प्रेरणादायक असेकार्यक्रम आयोजित केले जातात.

महात्मा गांधींनी भगवान गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानानुसार शांती व अहिंसेच्या मार्गाने लोकांना जागृत करुन देशात रक्तविहीन क्रांती केली, ही मोठी शक्ति गांधीजींच्या रुपात पाहायला मिळाली. गांधीजींच्या हाकेवर अनेक असाधारण लोक जमा झाले व त्या सगळयांच्या मदतीने स्वातंत्र्य लढा जिंकला. पं. जवाहरलाल नेहरु यांनी स्वातंत्र्य भारताला लोकशाहीमुल्ये रुजविण्यासाठी नवी दृष्टि दिली. देशाचा आर्थिककणा मजबूत व्हावा यासाठी त्यांनी पंचवार्षीक योजनेला दिले, त्याची फळे आज आपण चाखत आहोत. आधूनिक भारताच्या जडणघडणीत काँग्रेसपक्षाने महत्वपूर्ण भूमीका बजावली आहे. सतत धर्मनिरपेक्षतेची कास धरुन कार्य केले. गरीबांच्या हक्काच्या रक्षणासाठी पुढाकार घेणारा काँग्रेस हा एकमेव पक्षआहे. ब्रिटीशांच्या जुलमी जोखडातून देशवासीयांना सोडविण्याचे सामर्थ्य केवळ काँग्रेस पक्षातच होते. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर दैदिप्यमान काम करणाऱ्या या पूर्वजांनी सोपविलेला वारसा जोपासने आणि देशाला जगात अत्युच्य शिखरावर पोहचविण्याची सामाजिक आर्थिक व खाजगी स्वातंत्र्य मिळवून देण्याचे महत्त कार्य काँग्रेस कडून घडले, देशातील प्रत्येक नागरिकाला याची जाण आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास केवळ आपल्यासाठीच नव्हे तर देशवासीयांसाठी प्रेरणादायी आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही पक्ष काँग्रेस असल्याबाबतचा कृतार्थ अभिमान आम्हाला आहे. धर्मनिरपेक्षता आणि स्वातंत्र्यता हे आमचे सुत्र राहिले आहे. त्यांच्या नेतृत्वात आम्ही जागतिक मंदीतही आर्थिक विकासाकडे मजल मारु शकलो हे काँग्रेसपक्षाच्या यशाचे गमक आहे. देशाला ब्रिटीशाच्या जुलमी विळख्यातून सोडविण्याची जबाबदारी आमच्यावर होती, ध्येयवेडे होऊनच आम्हाला ते साध्य करता आले.

जागतीक घडामोडीमध्ये याच काळात भारताच्या शब्दाला महत्व प्राप्त होऊ लागले. तद्नंतर दिवंगत प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचे योगदान देशासाठी अनन्य साधारण महत्व होते. त्यांनी त्यांच्या काळात हरीतक्रांतीच्या माध्यमातून गरीबी हटाओ चा नारा देत जनसामान्याच्या आवाजाला हुंकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मांडलेल्या आर्थिक धोरणानूसार २० कलमी कार्यक्रम राबवून या देशात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित केली. त्यानंतर दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी पाहिलेले २१ व्या शतकाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाने भारताचे स्वप्न साकार केले, याचे संपूर्ण श्रेय दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांना जाते. भारतातील काना कोपऱ्यात केलेला प्रवास, त्या भागातील प्रश्न आणि प्रत्येक भारतीयास समजुन घेण्याची त्यांची तळमळ यातूनच त्यांनी देशातील तरुण-तरुणींना पूढे आणले, हे विसरता येणे शक्य नाही, यामुळे देश प्रगल्भ अवस्थेत आहे.

१५ जानेवारी १८४९ रोजी लेप्टनंट जनरल करिअप्पा हयांनी ब्रिटीश जनरल कडून कार्यभार स्वीकारला होता. हा दिवस देशभरात भारतीय सेना दिवस म्हणून साजरा केला जातो. देशाचा गौरव विशेष म्हणजे १५ जानेवारी २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झालीत. या ७५ वर्षाच्या इतिहासात भारतीय थलसेनेने असामान्य धैर्य, साहस, पराक्रम गाजवित भारत मातेच्या सीमेचे रक्षण केले. तसेच देशावर झालेल्या शत्रूंच्या आक्रमणा विरुध्द सडेतोड प्रतिउत्तर देवून शत्रूंना पायचित केले. भारतीय सेना जगात दुसरी मोठी सेना आणि चौथी शक्तीशाली सेना आहे. अशा या बलाढय, साहसी व पराक्रमी थलसेनेचा ७६ व्या वर्धापन दिनी भारतीय थलसेना दिवस म्हणुन देशभरात साजरा करण्यात आला.माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी अत्यंत सौम्य आणि संयम ऋषीमुर्तीने सुरळीत शासन चालवतांना नक्षलवाद, आतंकवाद, भाषावाद, प्रांतवाद, जातीयवाद या सर्ववादांना समुळ नेस्तनाबूत करण्यासाठी त्यांनी उचललेली पाऊले, खरेच देशाभिमान वाटावा अशीच म्हणावी लागेल. केवळ देशातच नव्हे, तर विदेशातही आदराचे स्थान कमावलेले आहे. आज भारताने जागतिक पातळीवर वेगळीच उंची गाठली आहे. देशाला आज ७५ वर्षे पूर्ण झालीत, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. प्रजासत्ताक दिनाच्या आजच्या शुभदिनी राष्ट्राची अस्मिता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आपण कटीबध्द होऊ या !

**कदम कदम बढाये जा, खुशी के गीत गाये जा**
**ये जिंदगी है कौम की, तू कौम पे लुटाये जा**

## प्रकरणात नाव नसताना तपास संस्थांना सहकार्य करतोय:स्वाभिमानी महाराष्ट्रात जे चालले आहे, ते चुकीचे – रोहित पवार

**मुंबई–**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक प्रकरणात ही चौकशी झाली. या बँकेवर काही राजकीय नेते संचालक होते. त्यांच्याविरोधात २०१८ साली अण्णा हजारे आणि इतर काही समाजसेवक न्यायालयात गेले होते. यावेळी काही चुकीच्या गोष्टी राजकीय नेत्यांकडून झाल्या आहेत. या प्रकरणात माझे नाव देखील नाही. त्यानंतर आपण तपास संस्थांना सहकार्य करत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.दरम्यान रोहित पवार पुढे बोलताना म्हणाले की, माझी ईडी चौकशी सुरु असताना ईडी कार्यालयाबाहेर हजारो लोक आले. राज्यभरातून आलेल्या लोकांनी मला पांठिबा दिला. जनता आमच्या बाजूने असल्याचे त्यातून समोर येत आहे. महाराष्ट्रात जे काही चालू आहे त्याच्या विरोधात आम्ही पूर्वी लढत होतो. तसेच आज पण आणि उद्या पण मी लढणार आहोत.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार रोहित पवार यांची ईडी चौकशी बुधवारी झाली. तब्बल ११ तास ही चौकशी सुरु होती. आता पुन्हा १ फेब्रुवारी रोजी रोहित पवार यांना चौकशीसाठी बोलवण्यात आले आहे. दरम्यान, या चौकशीत काय विचारणा झाली ? त्यासंदर्भात रोहित पवार यांनी माहिती दिली आहे.रोहित पवार म्हणाले की, महाराष्ट्राचा विकास करण्याऐवजी गुजरात विकास काही लोक करत आहेत. हिच लोक सत्तेत हेत. त्यांना आम्ही आधी विरोध केला आताही करणार आणि उद्याही करणार,स्वाभिमानी महाराष्ट्रात जे चालले आहे, ते चुकीचे आहे. पवार साहेब मार्गदर्शक राष्ट्रवादी काँग्रेसचे




प्रमुख म्हणून आणि बाप माणूस म्हणून आले होते. आम्हाला काही अडचण आली तर सोडता यावी, यासाठी ते आले होते. यावेळी कार्यकर्त्यांशी ते संवाद साधत होते. चौकशी सुरु असताना शरद पवार थोडे चिंतेत होते. तरीसुद्धा कार्यकर्त्यांशी कार्यकर्त्यांनी पाठबळ ते देत होते.रोहित पवार म्हणाले की, तपास संस्थांना सहकार्य करण्याची भूमिका आमची कायम आहे. माझी चौकशी सुरु असताना पवार साहेब स्वतः दहा-अकरा तास होते. यावरूनच साहेब कार्यकर्त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे असतात, हे स्पष्ट आहे. ईडी बँकेच्या या प्रकरणात काही कागदपत्रे हवी होती. ती सर्व कागदपत्रे आम्ही दिली आहेत. सर्व प्रकारची मदत आम्ही ईडीला करत आहोत. अधिकारी त्यांचे काम करतात, त्यांना लागणारी सगळी माहिती आम्ही दिलेली आहे. आम्ही कुठल्याही चुकीच्या गोष्टी केल्या नाही. त्यामुळे आम्ही घाबरत नाही, असे रोहित पवारांनी म्हटले आहे.

## कडाक्याच्या थंडीसोबत अवकाळी पावसाचा इशारा

## राज्यात १ फेब्रुवारीपर्यंत राहणार थंडीचा कडाका

**मुंबई–**राज्यात गेल्या काही चार-पाच दिवसांपासून वातावरण बदलले आहे. राज्यात कडाक्याची थंडी जाणवू लागली आहे. राज्यातील अनेक शहरांचा पारा दहा अंशाच्या खाली आला आहे. यावेळी शेतकऱ्यांसमोर संकट निर्माण करणारी परिस्थिती आहे. राज्यात थंड वारे वाहत असताना अवकाळी पावसाचे संकट आले आहे. कोकणात अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. नाशिक जिल्ह्यात यंदाच्या हिवाळ्यात सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे.उत्तर भारतातून येणाऱ्या वाऱ्यांचा वेग वाढल्यामुळे राज्यात कडाक्याची थंडी जाणवत आहे. बुधवारी धुळ्यात नीचांकी ४.७, तर निफाड येथे ५ अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली आहे. २८ जानेवारीपर्यंत दोन पश्चिमी चक्रवात येत



असल्याने १ फेब्रुवारीपर्यंत राज्यात थंडीचा कडाका राहणार असल्याचे हवामान विभागातून निवृत्त झालेले शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले.राज्यातील नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, बुलडाणा, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया शहरामंध्ये आगामी आठवडाभरात किमान तापमान हे १२ अंश सेल्सियस किंवा त्यापेक्षा कमी राहील. दिवसाही गारठा जाणवणार आहे.राज्यातील काही भागांत अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. मागील काही दिवसांपासून वातावरणात बदल होत आहेत. तापमानात देखील चढ उतार होत आहे. त्याचवेळी हवामान खात्याने कोकणात अवकाळी पावसाचा इशारा दिल्यामुळे शेतकऱ्यांसह आंबा बागायतदार पुन्हा एकदा चिंताग्रस्त झाले आहे. भारतीय हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार पुढील ४ते ५ दिवसात दाट धुके कायम राहण्याची शक्यता आहे.हवामानतज्ज्ञ रामचंद्र साबळे म्हणाले की, उत्तरेकडून व पश्चिमेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांचा वेग हा पठारावर जास्त आहे. त्यामुळेच किनारपट्टीलगत व सह्याद्रीच्या डोंगररांगांलगतच्या भागापेक्षा जळगाव, धुळे, नंदुरबार या पठार असलेल्या भागातील तापमान घसरले आहे. थंडीची ही स्थिती आठवडाभर म्हणजे पुढील मंगळवारपर्यंत कायम राहणार आहे. त्यामुळे किमान तापमान ४ व ५ अंशांपर्यंतच राहण्याची शक्यता आहे.नाशिकमधील निफाड तालुक्याचा पारा घसरला आहे. कुंदेवाडी येथील गहू संशोधन केंद्रामध्ये निफाडमध्ये ४.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. या हिवाळ्यातील हा तापमानाचा नीच्चांक आहे. थंडीमुळे द्राक्षांना तडे तसेच द्राक्ष फुगवणीवर परिणाम होणार आहे. वाढत्या थंडीमुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी संकटात आले आहे.

## आमचे घर डरपोक लोकांचे नाही:महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीसांचे राज्य आहे की अफजलखान, शाहिस्तेखानाचे ? – संजय राऊत

**मुंबई–**राज्यामध्ये मोगलाई चालू आहे का ? महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीसांचे राज्य आहे की अफजलखान, शाहिस्तेखानाचे राज्य आहे, का निजामशाही आली आहे ? असा संतप्त सवाल विचारत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर कडाडून टीका केली आहे.संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, या लोकांनी रोहित पवार यांना नोटी बजावली. मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांना नोटीस बजावता. जे डरपोक होते ते तुमच्या कळपात शिरले. या लोकांना लाज वाटली पाहिजे, असे टीकास्त्र त्यांनी डागले आहे. आयएनएस विक्रांतच्या नावाखाली पोपटलालने (किरीट सोमय्या) ३८ कोटी गोळा केले, त्याची तक्रार कुठे गेली, ती विरून गेली असा आरोपही त्यांनी केला आहे.संजय राऊत म्हणाले की, हे लोक सांगतात की आम्ही रामाचे भक्त आहोत, रामाची पूजा करतो. रामच यांचा वध करणार आहे. अजित पवारांचा घोटाळा बाहेर काढून पंतप्रधान मोदींनी त्यांना सरकारच्या जेलमध्ये टाकले असे म्हणत संजय राऊत यांनी अजित पवारांसह भाजपला उपरोधिक टोला लगावला. अजित पवारांना तुरुंगात टाकले ना. त्यांना उपमुख्यमंत्रीपद देऊन मांडीवर घेतले. अजित पवार, दुसऱ्या मांडीवर हसन मुश्रीफ आणि खांद्यावर प्रफुल्ल पटेलांना बसवले आहे. रामच तुमचा वध करणार आहे.संजय राऊत म्हणाले की, विरोधी पक्षातील लोकांना नोटीस देण्याचं भाजपाचे तंत्र आहे. संदीप राऊतांना दिलेल्या नोटीशीच कारण हास्यास्पद आहे. आम्ही गुडघे टेकणारे लोक नाही, दोन-पाच लाखांसाठी, व्यवहारासाठी तुम्ही आम्हाला नोटीशी पाठवता, तुम्ही काय चिंचोके खाता ? असा सवालही त्यांनी सरकारला विचारला आहे.संजय राऊत म्हणाले की,आमच्यावर बाळासाहेब ठाकरे, यशवंतराव चव्हाण, शरद पवार, उद्धव ठाकरे यांचे संस्कार आहेत त्यामुळे आम्ही कुटुंबापर्यंत जाणार नाही. आमच्यावर ते संस्कार नाहीत. तुमची लढाई आमच्याशी आहे ना तर आमच्याशी लढून दाखवा. हे नामर्द लोक आहेत. आमचे घर डरपोक लोकांचे घर नाही. शिवसेना आमच्या रक्तात आहे. तुमच्या घरातले लोक लंडनमध्ये कितीतरी दिवस, महिने राहतात. त्यासाठी पैसे कुठून आले ? लंडनमधला व्हिला, प्रवास खर्च याचे प्रायोजक कोण आहेत ? असे आम्ही विचारी शकतो. पण आम्ही कुटुंबापर्यंत जात नाही.

## आरक्षण देण्याच्या केवळ थापा:मराठा समाजाला मुंबईत यावे लागणे हेच शिंदे-भाजपा सरकारचे मोठे अपयश-नाना पटोले

**मुंबई–**मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मोठे आंदोलन उभे केले आहे, सरकारने त्यांच्याशी चर्चा केली, राणाभिमदेवी थाटात अनेक घोषणा केल्या. मराठा समाजाला आरक्षण देणारच असे जाहीरपणे सांगितले तरीही अद्याप आरक्षण मात्र दिलेले नाही. सरकार मराठा समाजाची दिशाभूल करत आहे. मुंबईत येण्याचा इशारा दिल्यानंतरही सरकारने तातडीने पावले उचलली नाहीत. मराठा समाजाला आरक्षणाच्या नावाने केवळ भुलथापा देण्यात आल्या त्यामुळेच मराठा समाजाला मुंबईत यावे लागत आहे, हे शिंदे-भाजपा सरकारचे मोठे अपयश आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, आरक्षण प्रश्नावर शिंदे-भाजपा सरकारचा समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, शिंदे-भाजपा



सरकारच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्याशी सरकारच्या प्रतिनिधींनी अनेकदा चर्चा करुन आश्वासन दिले. सरकारचे दोन मंत्री सातत्याने मनोज जरांगे पाटील यांच्या संपर्कात होते, पण आता हे दोन मंत्री मागील काही दिवसांपासून जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करताना दिसत नाहीत. हे मंत्री आता चर्चा का करत नाहीत? आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला मुदत दिली होती, ती मुदत संपली, त्यानंतर सरकारने दिलेली तारीखही संपली परंतु अद्याप आरक्षणाचा निर्णय काही झालेला नाही. सरकार मराठा समाजाला केवळ तारीख पे तारीख देत असून हा मराठा समाजाचा घोर अपमान आहे.नाना पटोले म्हणाले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, सत्ता आल्यास एका महिन्यात मराठा समाजाला आरक्षण देतो आणि मराठा समाजाला आरक्षण देण्याची हिम्मत फक्त फडणवीसमध्येच आहे, अशा वल्गना केली होती, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत कटकारस्थान करून भाजपाने सत्ता मिळवून आज दीड वर्ष झाली तरी देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावला नाही. फडणवीस यांची ती राणा भिमदेवी थाटात केलेली गर्जना कुठे गेली? देवेंद्र फडणवीस व भाजपा मराठा आरक्षणावर आत्ता गप्प का? मराठा आरक्षण देवेंद्र फडणवीस यांनीच दिले होते, असा प्रचार करणारे भाजपाचे पोपटही मराठा आरक्षणावर गप्प आहेत.नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा आरक्षण विरोधी असून ते कोणत्याच समाज घटकाला आरक्षण देणार नाहीत. आरक्षणाच्या प्रश्नावर भाजपा सरकारने राज्यातील मराठा समाज व ओबीसी समाजात तेढ निर्माण करण्याचे पाप केले आहे. आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवणे व जातनिहाय जनगणना करणे हाच आरक्षणावरील पर्याय असून काँग्रेसने तशी मागणी आहे परंतु भाजपाचा जातनिहाय जनगणना करण्यास विरोध आहे आणि केंद्रातील मोदी सरकार आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवण्याचा निर्णयही घेत नाही, असे पटोले म्हणाले.

## दिनेश वंजारी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश



**मूल । प्रतिनिधी**

फिस्कुटी ग्रामपंचायतचे सदस्य युवा नेतृत्व दिनेश वंजारी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये मूल येथे झालेल्या कार्यक्रमादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष नितीन भटारकर,राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा अध्यक्ष पंकज ढेगळे,मुल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार,मुल शहर अध्यक्ष आकाश येसनकर, युवक तालुका अध्यक्ष रोहित कामडे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश घेतला.फिस्कुटी ग्रामपंचायतचे सदस्य दिनेश वंजारी यांची डॅशिंग व्यक्तिमत्व म्हणुन परिसरात ओळख असुन जनसामान्य माणसाच्या प्रश्नासाठी सतत ते कार्यरत असतात. या अगोदर त्यांनी शिवसेनेकडून पंचायत समितीची निवडणूक लढविली आहे. त्याच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये झालेल्या प्रवेशामुळे फिस्कुटी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मजबुती मिळणार आहे.दिनेश वंजारी यांच्या पक्षप्रवेशासाठी तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार गेल्या अनेक दिवसापासून प्रयत्नशील होते.लवकरच दिनेश वंजारी याच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मोठी संघटनात्मक जबाबदारी सोपविण्यात येणार असुन त्याच्या पक्षप्रवेशामुळे तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## गोंडपीपरी येथील चिंतामणी महाविद्यालयात नमो नवमतदाता संम्मेलन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने देशभरातील तमाम नवमतदार तरूण-तरूणींशी नमो नवमतदाता संम्मेलनाच्या माध्यमातून जाहीर संवाद साधला.या आभासी संवादाचे आयोजन गोंडपीपरी शहरातील चिंतामणी महाविद्यालयात करण्यात आले होते. यासोबतच याठिकाणी नमो प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात आले होते.या प्रदर्शनीला उपस्थित नवमतदारांनी भेट देत मोदी सरकारच्या विकासकार्याची माहिती घेतली. त्यानंतर नमो नवमतदाता माय फर्स्ट वोट फॉर मोदी अभियानात सहभागी होत भाजपतर्फे उपलब्ध क्यू आर कोड च्या माध्यमातून आपले अभिप्राय नोंदविले. यावेळी बबन निकोडे तालुकाध्यक्ष, साईनाथ मास्टे अध्यक्ष संगानियो,चेतन गौर शहराध्यक्ष,राकेश पुन नगरसेवक,मनीष वासमवार माजी उपसभापती, प्रशांत येल्लेवार, वैभव बोनगीरवार यांचेसह मोठ्या संख्येने नवमतदारांची उपस्थिती होती.



# सुदृढ लोकशाहीसाठी मतदार जागरूक असणे आवश्यक-जिल्हाधिकारी गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निवडणूक हा लोकशाहीचा केंद्रबिंदूआहे. राज्यघटनेने आपल्यालामतदानाचा अधिकार दिला आहे.हा अधिकारसर्वांनी निर्भीडपणेबजावून कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आगामी निवडणुकीत मतदान करावे. सुदृढ लोकशाहीसाठी मतदार जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मतजिल्हाधिकारी विनय गौडायांनी व्यक्त केले.नियोजन सभागृह येथेराष्ट्रीय मतदार दिनानिमित्तआयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, तहसीलदार विजय पवार, प्रभारी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अतुल जताळे, पॅरा ऑलंपिकमध्ये सूवर्ण पदक विजेते व निवडणूक विभागाचे ब्रॅन्ड म्बेसेडर नईमुद्दीन शेख उपस्थित होते. 'नथिंग लाईक व्होटिंग, आय व्होट फॉर शुअर' हे यावेळेसच्या मतदार दिनाचे घोषवाक्य आहे, असे सांगून जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत जिल्ह्यात संक्षिप्त मतदान पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. अर्हता दिनांक १ जानेवारीप्रमाणेच आता वर्षभर १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर या तारखेपर्यंतसुध्दा मतदार यादीत नाव नोंदणी करता येते. लोकशाही प्रक्रियेमध्ये मतदानाला सर्वात जास्त महत्व आहे. त्यासाठी आपले नाव मतदार यादीमध्ये असणे आवश्यक असून आपले नाव अचूक आहे का, यासाठी मतदारांनी यादी तपासून घ्यावी. नि:पक्ष आणि मुक्त वातावरणात निवडणूका पार पाडणे ही सर्वांची जबाबदारी आहे. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता सद्सद् विवेक बुध्दी वापरून नागरिकांनी मतदान करावे. आपला हक्क अतिशय पारदर्शकपणे वापरला तरच देश मजबूत होईल. चंद्रपूर शहरात गत निवडणुकीत मतदानाची टक्केवारी कमी होती. त्यामुळे येणा-या निवडणुकीत मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले.



## त्याप्रकल्पातंर्गत संबंधित भूधारकांना यापुर्वीच मोबदला व सानुग्रह अनुदानाचे वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिंडोरा बॅरेज ही योजना वरोरा तालुक्यातील सोईट, दिंडोरा गावाजवळ वर्धा नदीवर बांधकामाधीन आहे. सदर बॅरेजच्या बुडीत क्षेत्राकरीता भूसंपादन अधिनियम-१८९४ अन्वये १०९९.११ हेक्टर खाजगी जमीन संपादीत करण्यात आली असून सदर जमिनीच्या भुसंपादनाकरीता भुसंपादन कायद्यानुसार १२.१६ कोटी मोबदला महसूल विभागामार्फत अदा करण्यात आला होता. परंतू, सदर मोबदला अत्यल्प असल्याने न्यायालयात गेलेल्या भुधारकांना वाढीव मोबदल्यापोटी १२.७० कोटी इतका मोबदला अदा करण्यात आला आहे.

तथापी, प्रकल्पग्रस्तांनी जमिनीचा मोबदला अत्यल्प दराने मिळाला असल्याने वाढीव मोबदला देण्याची आग्रही मागणी केली होती. त्याअनुषंगाने, तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली २३ एप्रिल २०१८ रोजी च्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना ३.२५ लक्ष प्रती हेक्टरप्रमाणे अनुदान देण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशान्वये, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या बैठकीत ३४ कोटीच्या सानुग्रह अनुदान प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व प्रकल्पांतर्गत संबंधित भुधारकांना विशेष भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत सानुग्रह अनुदानाचे ३३.८८ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहे.

यापूर्वी, दिंडोरा बॅरेज प्रकल्प ग्रस्तांना देण्यात आलेल्या सानुग्रह अनुदानाच्या धर्तीवर राज्यातील इतर प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांनी वाढीव सानुग्रह अनुदानाची मागणी केली आहे. महामंडळाच्या पत्रानुसार जलसंपदा विभागाच्या अपर मुख्य सचिवांना दिंडोरा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या मागण्यांचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. महामंडळातर्फे शासनास सादर अनुपालनाच्या अनुषंगाने, ८ ऑगस्ट २०२३ च्या पत्रान्वये,भुसंपादन अधिनियम-२०१३च्या कायद्यान्वये मोबदला अदा करण्यात यावा, या प्रकल्पग्रस्तांच्या मागणीवर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी २३ एप्रिल २०१८ च्या बैठकीत सानुग्रह अनुदानास मंजुरी दिली. त्यामुळे पुन्हा प्रकल्पग्रस्तांना भुसंपादन अधिनियम-२०१३च्या कायद्यान्वये मोबदला देय होत नाही.आणि दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्तांना नवीन भूसंपादन-२०१३ कायद्यान्वये वाढीव मोबदला देणे शक्य होणार नाही. तसेच जलसंपदा मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी बैठक घेण्याचे आश्वासन डिसेंबर-२०२३ मधील अधिवेशनात दिले होते.दिंडोरा बॅरेज ही योजना प्रथमतः सेंट्रल इंडिया पावर कंपनीच्या १ हजार मेगावॅट विद्युत निर्मितीकरीता प्रस्तावित होती. परंतू सिपको कंपनीसोबत विहित मुदतीत करारनामा न झाल्याने सदर प्रकल्प सुरू होऊ शकला नाही. तदनंतर, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार हा प्रकल्प बहुउद्देशीय प्रकल्प म्हणून घेण्याचे ठरले. असे चंद्रपूर, मध्यम प्रकल्प विभाग क्र.१ चे उपकार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

## देशाच्या प्रगतीसाठी पुढील २५ वर्षे युवकांनी आपले योगदान द्यावे - पंतप्रधान नरेंद्र मोदी

### नमो नवमतदार सम्मेलनात चंद्रपूरात भाजयुमोतर्फे हजारों युवकांनी सहभाग नोंदविला

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व समाजासाठी निरनिराळे योजना राबविल्या व आजही राबवित आहेत. याच धर्तीवर युवकांनी देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याच्या दृष्टीने नमो मतदार सम्मेलन देशात सर्व ठिकाणी आयोजित करण्याची योजना आखली. मुख्यतः पुढील २५ वर्षात देशाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी युवकांनी स्वत:ला झोकुन द्यावे,असे भावनिक आवाहन मोदीजींनी या सम्मेलनाच्या उद्बोधन प्रसंगी केले. मेरा युवा भारत या योजनेला युवक व विद्यार्थी यांनी जुळावे असे आवाहन सुध्दा याप्रसंगी मोदीजींनी केले.



याच संकल्पनेतून भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित नमो नवमतदार संमेलन संपूर्ण देशामध्ये५०००पेक्षा अधिक ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. त्यात चंद्रपूर महानगर येथे जनता महाविद्यालय व राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली व भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे व भारतीय जनता युवा मोर्चा चंद्रपूर जिल्हाध्यक्ष विशाल निंबाळकर यांच्या नेतृत्वामध्ये घेण्यात आला.शेकडोच्या संख्येमध्ये नवमतदार विद्यार्थी व विद्यार्थिनी मोदीजींचे संबोधन ऐकण्यासाठी जमा झाले होते. कार्यक्रमात प्रामुख्याने भारतीय जनता पार्टी ओबीसी विभाग महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशोक जीवतोडे,माजी जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे,जिल्हा महामंत्री ब्रिजभूषण पाझारे,भाजयुमो महामंत्री प्रज्वलंत कडू,प्रमोद क्षिरसागर,उपाध्यक्ष व सिनेट सदस्य यश बांगडे,देवानंद वाढई,प्रदीप किरमे,विनोद शेरकी,रवी लोणकर,रवी जोगी,गणेश रामगुंडेवार,सतीश तायडे,मनीष पिपरे,पप्पू बोपचे,संजय पटले,राहुल पाल,स्नेहीत लांजेवार,कुणाल गुंडावार,प्रवीण उरकुडे,प्रवीण गिलबिले,यश ठाकरे,मयूर चहारे,आकाश मस्के,अनुप शर्मा,ऐश्वर्य बांगडे,जयश्री आत्राम,महेश कोलावार यांची उपस्थिती होती.

## समाज उपयोगी साहित्य घेण्यासाठी माजी आ.दिपक आत्राम यांच्या कडून आर्थिक मदत

### चिरेपल्ली येथील आदिवासी समाज बांधवांचा पुढाकार

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील खांदला ग्राम पंचायत हद्दीतील चिरेपल्ली हे गाव शहरी भागापासून दूर असून गावात ये-जा करायला रस्ता नसून सामाजिक व व्यक्तिक कार्यक्रमात बिछायत चे सामान व साऊंड सिस्टीम चे साहित्य साठी बिछायत केंद्र कडून ज्यादा चे पैसे गावकऱ्यांकडून वसूल करत असून त्यामुळे चिरेपल्ली येथील आदिवासी समाज बांधवांनी लोक वर्गणीतुन गावासाठी बिछायत चे साहित्य व साऊंड सिस्टीम घेण्याचे ठरविले त्यानंतर गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनी भारत राष्ट्र समितीचे नेते, आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष तथा माजी आमदार दिपकद आत्राम यांच्या निवासस्थानी भेट घेऊन ही बाब सांगितल्यावर माजी आमदार दिपक आत्राम यांनी तात्काळ आर्थिक मदत करून भविष्यात चिरेपल्ली गावासाठी व आपल्या आदिवासी समाजासाठी मी वेळोवेळी सहकार्य करणार असल्याचे आश्वासन दिले.आर्थिक मदत मिळाल्याने चिरेपल्ली गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनी माजी आमदार दिपकदादा आत्राम यांचे आभार मानले.

आर्थिक मदत देते वेळी माजी उपसरपंच भगवान मडावी,माजी उपसरपंच गुरुदास पेन्दाम,प्रदिप पेन्दाम,गणेश मडावी,मोरेश्वर आलाम,रघुनाथ मडावी,रावजी गावडे,संतोष मडावी,जुलेख शेख,विनोद कावेरी,माजी सरपंच विजय कुसनाके,सुधाकर कोरेत उपस्थित होते.



## हंसराज अहीर यांनी अयोध्याधामी घेतले रामललांचे दर्शन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दि. २५ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येस भेट देवून रामललांचे दर्शन घेतले. देशात परस्पर स्नेह, शांतता व बंधूभाव वृध्दींगत व्हावा तसेच देशवासीयांना सुख, समृध्दी व निरामय आरोग्य लाभो अशी प्रभु चरणी प्रार्थना केली.

दि. २२ जानेवारी रोजी अयोध्या येथील प्रभु श्रीरामचंद्रांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा होती त्या ऐतिहासीक सोहळ्याचे निमंत्रण सुध्दा हंसराज अहीर यांना देण्यात आले होते. परंतू या पवित्र सोहळादिनी त्यांच्या कन्येचा विवाह समारंभ असल्याने ते या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे दि. २५ रोजी त्यांनी अयोध्येस जावून श्री रामललांचे दर्शन घेतले व पूजा अर्चना केली.

## लोकमान्य महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी गिरविले मतदानाचे धडे

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील स्थानिक लोकमान्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व निवडणुक विभाग, तहसील कार्यालय वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ जानेवारी २०२४ 'राष्ट्रीय मतदार दिना'निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री या होत्या. तर प्रमुख उपस्थितीत ज्ञानेश्वर चहारे (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, वरोरा) व डॉ. दीपक लोणकर (नोडल आधिकारी, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा) हे होते. या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती ज्ञानेश्वर चहारे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून 'लोकशाहीच्या संवर्धनासाठी मतदान आवश्यक आहे', असे मत मांडले. तर अध्यक्ष डॉ. जयश्री शास्त्री यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून 'राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य' विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांना मतदानाची शपथ देण्यात आली. यासोबत निवडणूक विभाग, तहसील कार्यालय वरोरा येथील वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना ईव्हीएम मशीनच्या द्वारे मतदानाचे प्रात्यक्ष करून दाखवले त्यांनी आपल्या मार्गदर्शनात बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅटचे कार्ये विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान करून पाहिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेविका समीक्षा उपरे यांनी केले. प्रस्ताविक व मान्यवरांच्या परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. तानाजी माने यांनी केले. तर मान्यवरांचे आभार रासेयो स्वयंसेविका निशा कौरासे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### प्राणप्रतिष्ठा दिनाचे विशेष आकर्षण ठरली

## रांगोळी द्वारे साकारलेली प्रभू श्रीरामाची मूर्ती

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शंकरपूर येथे प्राणप्रतिष्ठा दिनाचे औचित्य साधून दिनांक २२ जानेवारीला विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी नऊ वाजता जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सतीश वारजूकर यांच्या हस्ते श्रीराम प्रभूच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर गावातील नागरिकांनीही दिवसभर श्रीराम प्रभू चे दर्शन घेऊन पूजा अर्चना केली.

सकाळी दहा वाजता पासून हनुमान मंदिर किल्ला देवस्थान येथे अनेक भजन मंडळांनी भजनाचा कार्यक्रम सादर केला त्यात आदर्श अहिल्याबाई महिला मंडळ शंकरपूर, गायत्री महिला मंडळ शंकरपूर, माऊली महिला मंडळ शंकरपूर, संताजी भजन मंडळ शंकरपूर, दत्त भजन मंडळ शंकरपूर या मंडळांनी सहभाग घेतला हा भजन कार्यक्रम सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुरू होता. किल्ला मंदिर देवस्थान येथे शंकरपूर येथील योगेश पचारे यांनी रांगोळी द्वारे साकारलेली कलात्मक श्रीराम प्रभू ची मूर्ती या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. ही कलाकृती पाहण्यासाठी गावातील नागरिकांनी प्रचंड गर्दी केली सायंकाळी पाच वाजता प्रभू श्रीरामाची मिरवणूक गावांमधून काढण्यात आली मिरवणुकीत असंख्य गावाकऱ्यांनी सहभाग घेतला या यावेळी नागरिकांना बुंदा तसेच महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .